**राखीव वनाचे सर्व्हेक्षण, जमाबंदी व सिमांकन (४४०६-००५३) योजनेअंतर्गत पुणे वनवृत्ताकडून समर्पित झालेला निधी बांबु प्रयोगीक रोपवन क्षेत्र वानाडोंगरी व नागलवाडी, नागपूर येथील चेन लिंक फेनसींग बांधण्याकरिता खर्च करण्यास मंजूरी देण्याबाबत...**

**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वन विभाग**
**शासन निर्णय क्रमांक :- एस-१०/२०१७/प्र.क्र.२७२/फ-३**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,
दिनांक : ३१ मार्च, २०१८.

वाचा :-

१) अपर प्रधान मुख्य वनंसरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास) यांचे पत्र क्र.-कक्ष-१/पी/यो/नबाप्र/प्र.क्र.२४/(००५३)/३५१/१७-१८, दिनांक २५.०५.२०१७.
२) शासन निर्णय समक्रमांक दि.५.०६.२०१७, दि.८.०६.२०१७, दि.५.०७.२०१७, दि.१७.११.२०१७, दि.२५.०१.२०१८ व दि.१४.०३.२०१८.
३) वित्त विभागाचे शासन परिपत्रक क्र.अंर्थसं-२०१७/प्र.क्र.७५/अर्थ-३, दिनांक ६.०२.२०१८.
४) अपर प्रधान मुख्य वनंसरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास) यांचे पत्र क्र.-कक्ष-१/पी/यो/नबाप्र/प्र.क्र.२४/(००५३)/२३१४/१७-१८, दिनांक १२.०३.२०१८.
५) अपर प्रधान मुख्य वनंसरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास) यांचे पत्र क्र.-कक्ष-१/पी/यो/नबाप्र/प्र.क्र.२४/(००५३)/२५१३/१७-१८, दिनांक २९.०३.२०१८.

**प्रस्तावना :**

राज्य योजनेअंतर्गत सन २०१७-१८ करिता राखीव वनांचे सर्व्हेक्षण, जमाबंदी व सिमांकन यासंदर्भात उपशिर्ष (४४०६-००५३) योजनांतर्गत एकूण रु.१०२०.०० लक्ष इतका नियतव्यय अर्थसंकल्पित करण्यात आलेला आहे.

वित्त विभागाच्या दिनांक ६.०२.२०१८ रोजीच्या परिपत्रकानुसार, सन २०१७-१८ मध्ये ०२ मजूरी साठी १०० %, महसूली लेख्यातील निधी ७० % तसेच भांडवली लेख्यातील ८०% मर्यादेत निधीचे वितरण करण्याचे अधिकार संबंधित प्रशासकीय विभागांना प्रदान केले आहेत. त्यानुसार अर्थसंकल्पित असलेल्या रु.१०२०.०० लक्ष निधी पैकी वितरणासाठी उपलब्ध असलेली एकूण रु. ८५०.६० लक्ष इतका निधी संदर्भ क्र. २ च्या शासन निर्णयांन्वये वितरीत करण्यात आला आहे.

अपर प्रधान मुख्य वनंसरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी त्यांच्या संदर्भ क्र.५ च्या पत्रान्वये शासनास विनंती केली आहे की, बांबु प्रयोगीक रोपवन क्षेत्र वानाडोंगरी व नागलवाडी, नागपूर येथील सर्व्हे क्र. १६३ व ३४ भोवती चेन लिंक फेनसींग बांधण्यासाठी रु. ९७.२६ लक्ष निधीस प्रशासकीय मान्यता प्रदान केली होती. परंतू सदर कामाकरिता शासन निर्णय दिनांक १४.०३.२०१८ अन्वये रु. ४३.२६ लक्ष निधी वितरीत करण्यात आला असून रु. ५४.०० लक्ष निधी सदर कामाकरिता वितरीत करणे प्रलंबित आहे. तसेच सन २०१७-१८ मध्ये सदर योजनेअंतर्गत मुख्य वनसंरक्षक (प्रा.) पुणे यांना दिलेल्या अनुदानातून रु. ५३.६० लक्ष निधी समर्पित केलेला आहे. सबब, समर्पित करण्यात आलेला रु. ५३.६० लक्ष निधी बांबु प्रयोगीक रोपवन क्षेत्र वानाडोंगरी व नागलवाडी, नागपूर येथील चेन लिंक फेनसींग बांधण्याकरिता आवश्यक खर्च करण्यास मंजूरी प्रदान करण्याबाबतचा प्रस्ताव सादर केला आहे.

तरी, मुख्य वनसंरक्षक (प्रा.), पुणे यांनी सदर योजनेअंतर्गत समर्पित केलेला रु. ५३.६० लक्ष निधी बांबु प्रयोगीक रोपवन क्षेत्र वानाडोंगरी व नागलवाडी, नागपूर येथील चेन लिंक फेनसींग बांधण्याकरिता वितरित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

**शासन निर्णय:**

सन २०१७-१८ करिता "राखीव वनाचे सर्वेक्षण, जमाबंदी व सिमांकन" (४४०६ ००५३) या योजनेअंतर्गत एकूण रु. ८५०.६० लक्ष निधी वितरीत करण्यात आलेला आहे. त्यापैकी मुख्य वनसंरक्षक (प्रा.), पुणे यांनी रु. ५३.६० लक्ष निधी समर्पित केला आहे. सदर समर्पित करण्यात आलेला **रु. ५३.६० लक्ष (०२ मजूरी- रु. ९,०९,०५६/- + २७ लहान बांधकामे रु. ११,४०,६०८/- + ५३ मोठे बांधकामे रु. ३३,१०,३३६/-)** निधी बांबू प्रायोगीक रोपवन क्षेत्र वनाडोंगरी व नागलवाडी, नागपूर येथील झुडपी सर्व्हे क्र. १६३ व ३४ भोवती चेन लिंक फिन्सींग द्वारे संरक्षक भिंत बांधकाम करण्याकरिता पुढील अटींच्या अधीन राहून खर्च करण्यास मंजूरी देण्यात येत आहे :-

१) ज्या प्रयोजनासाठी खर्चास मंजूरी देण्यात आली आहे, त्याच प्रयोजनावर निधी खर्च करण्यात यावा.
२) यामध्ये कोणत्याही प्रकारची वित्तिय अनियमितता होणार नाही, याची पुरेपूर दक्षता घेण्यात यावी.
३) वित्त विभागाने दिनांक ११/७/२००१ रोजीच्या शासन निर्णयान्वये विहित केलेल्या वित्तिय मर्यादा यापुढेही लागू राहतील.
४) सदर मान्यता ही सन २०१७-१८ या कालावधी करिताच देण्यात येत आहे.

सदर खर्च हा मागणी क्रमांक- सी-१०, ४४०६ वनीकरण व वन्यजीवन यावरील भांडवली खर्च राज्य योजनांतर्गत योजना वनाचे सर्वेक्षण, जमाबंदी व सिमांकन (४४०६-००५३) या शीर्षाखाली दर्शविण्यात यावा व सन २०१७-१८ मध्ये मंजूर अर्थसंकल्पित अनुदानातून भागविण्यात यावा. निधी खर्च करताना वित्त विभागाने मासिक निधी विवरणपत्र तसेच इतर बाबतीत दिलेल्या सूचनांचे पालन करण्यात यावे.

सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या दिनांक ६.०२.२०१८ रोजीचे परिपत्रक आणि वित्त विभागाचा शासन निर्णय क्रमांक वि.अ.प्र.-२०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनियम/भाग-२, दि. १७/४/२०१५ भाग पहिला उप विभाग-३ परिच्छेद २७ (२) अन्वये विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारास अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१८०४०२११५६२०५४१९ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

Virendra R Tiwari

Digitally signed by Virendra R Tiwari
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue And Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=a95e1a9759002ee190cd79464daaba7dc840ec375cd62a646a64986631086810, cn=Virendra R Tiwari
Date: 2018.04.02 11:57:57 +05'30'

( वीरेंद्र तिवारी )
मुख्य वनसंरक्षक (मंत्रालय)

**प्रत :-**

१. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
२. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास) महाराष्ट्र राज्य, नागपूर.
३. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (संधारण) महाराष्ट्र राज्य, नागपूर
४. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र बांबु विकास मंडळ, नागपूर.
५. मुख्य वनसंरक्षक (प्रा.), पुणे.

६. मुख्य वनसंरक्षक आणि वन संवर्धनतंज्ञ, पुणे.
७. मुख्य वनसंरक्षक (भूमी अभिलेख कक्ष), नागपूर.
८. महालेखापाल-१/२ (लेखा व अनुज्ञेयता/ लेखा परीक्षा), महाराष्ट्र राज्य, मुंबई / नागपूर.
९. नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
१०. वित्त विभाग, व्यय १०/ अर्थसं-४ मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
११. कार्यासन अधिकारी (फ-२) महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
१२. कार्यासन अधिकारी, ब-१, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
१३. निवडनस्ती, कार्यासन (फ-३), म.व.व.वि., मंत्रालय, मुंबई-३२.